| MHKO070006512024 | नियमित दिवाणी दावा क्र.९२/२०२४ मधील नि.१२ खालील आदेश<br>अशोक थोरवत आणि इतर<br>वि.<br>प्रकाश थोरवत आणि इतर |
|---|---|

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्ती करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे, वादी यांनी वाटपाबाबत व मनाईबाबत प्रस्तुतचा दावा दाखल केला असुन सदर दावेत प्रतिवादी यांचे सरनामेत प्रतिवादी क्र.१ श्री.प्रकाश गोविंद थोरवत म.वा असा मजकूर नजरचुकीने व टायपिंग मिस्टेकमुळे नमुद झाला आहे. वस्तुस्थीतीप्रमाणे प्रकाश हा हयात असुन तो प्रतिवादी क्र.१ असुन त्यांचे विरूध्द देखील मनाईची मागणी वादी यांनी आपल्या दावेत केली आहे. विलास प्रतिवादी क्र.२ हा मयत आहे. अशा स्थीतीत टायपिंग मिस्टेकमुळे व नजरचुकीने प्रतिवादी क्र.१ श्री.प्रकाश गोविंद थोरवत यांच्या पुढे " म. वा " असा मजकुर नमुद झाला असलेने त्याप्रमाणे दावेत दुरुस्ती होणे आवश्यक असलेने श्री. प्रकाश गोविंद थोरवत त्यांच्या पुढील " म. वा " या अक्षरास व मजकुरास काट देवुन त्याठिकाणी व.व.६७, धंदा-शेती, रा.मु.पो.घालवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर असा मजकुर नमुद करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे. येणेप्रमाणे दुरुस्ती ही टायपिंग मिस्टेकमुळे झाली असलेने दुरुस्तीमुळे दावेच्या स्वरुपात कोणताही फरक पडत नाही. तरी सदरची दुरुस्ती मंजुर करणेत यावी. यामुळे न्यायास मदत होणार आहे व वादींचे नुकसान टळणार आहे असे कथन केले आहे.

३. प्रतिवादी क्र.२.१ यांच्या म्हणण्याप्रमाणे, वादी यांचा दावा दुरुस्तीचा अर्ज व त्यामधील कथने चुकीची व लबाडीची असल्याने ती यातील प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाहीत, प्रतिवादी त्याचा स्पष्टपणे इन्कार करतात. वादी यांनी अर्जात मागणी केलेली दुरुस्ती यातील प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. वादी यांना दावा मिळकत व प्रतिवादी यांचे विषयी काही एक माहिती नसलेकारणाने त्यांनी नि.१ कडे प्रतिवादी यांना मयत दर्शविले आहे त्यामुळे सदरची टायपिंग मिस्टेक आहे हे इतक्या विलंबाने वादी कथन करतो हे कारण संयुक्तीक नसल्याने कारणे अर्ज फेटाळण्यात यावा. सदरच्या दुरुस्तीद्वारे वादी हा मे.कोर्टासमोर नविन केस आणत आहे. त्यामुळे देखील अर्ज नामंजुर करणेत यावा. सदरची दुरुस्ती नामंजूर केलेस वादीस कोणतीही हानी होणार नाही. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार

आहे. तसेच सदर दुरुस्तीस झालेल्या विलंबाबाबत कोणतेही योग्य व संयुक्तीक कारण वादीने दिलेले नाही. वादीचा दावा दुरुस्तीचा हा अर्ज सदसदविवेक बुध्दीचा व प्रमाणिकपणाचा मुळीच नाही. तसेच सुचित दावा दुरुस्तीने दावेचे मुळ स्वरुपात अमुलाग्र बदल होवुन दावेचे स्वरुप बदलणार आहे. त्यामुळे अशी मुळ दावेत बदल होणार दुरुस्ती कायद्याने मंजुर करता येणार नाही असे प्रस्तुत प्रतिवादी यांचे प्रामाणिक कथन आहे. सुचित दुरस्तीने न्यायदानास मुळीच मदत होणार नाही. उलट या सुचित दुरुस्तीने मल्टीप्लीकेशन ऑफ प्रोसिडींग वाढणार आहे. वादीचा अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास वादीस जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी अशी विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली आहे.

**४.** वादी व प्रतिवादी क्र.२.१ यांचे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.२.२ व २.३ यांनी बरीच संधी देवुनही आपले म्हणणे दाखल केले नाही. म्हणुन त्यांच्याविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारित करुन सदरचा अर्ज विना म्हणणे चालविण्यात आला. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. वादी यांनी सदरचा दावा हा वाटपाबाबत व कायम मनाईबाबत दाखल केलेला आहे. वादी यांनी मागीतलेली मागणी ही दाव्याच्या सरनामेत मागितलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ हा मयत आहे अशी वादी यांच्या टायपिंग मिस्टेकमुळे व नजरचुकीमुळे झालेली चुक आहे. यातील वादी हे दाव्यामध्ये कोणतीही मागणी करत नाहीत. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही फरक पडत नाही. वादी यांनी दिलेला अर्ज हा ॲफिडेव्हीट सोबत दिलेला आहे. दाव्याच्या सरनामेत मागीतलेली मागणी ही वादी व प्रतिवादी यांचेमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक आहे असे दिसुन येते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज (नि.१२) मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेस किंवा त्यापूर्वी करावी व दुरूस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

स्वाक्षरीत/-

**(वनिता एम. कोळेकर)**
३ रे सह दिवाणी न्या.क.स्तर,
जयसिंगपूर

दि.१६/०८/२०२४.